# १. गणेशवंदना

बालरूपासी सर्वांआधी वंदन मी करतो।
बालसूर्य जणू पुढे उभा असाच तू दिसतो।।१।।

शस्त्र सज्ज हा वीर गणेशा सर्वां आवडतो।
नाग पाश परशू हाती असा सज्ज दिसतो।।२।।

सिद्धिगणेशा तुलाही आम्ही मनोमनी स्मरतो।
समृद्धी ही तुझीच कृपा सदैव अनुभवतो।।३।।

रक्तवर्ण तू गौरीसूता विघ्न नष्ट करतो।
हात जोडूनी हेरंबा तुला शरण येतो।।४।।

गणपतीबाप्पा तुझ्या कृपेची प्रचिती ही यावी।
मनापासूनी कष्ट करावे बुद्धी तू द्यावी।।५।।

Scanned with CamScanner

# ५२. अण्णा आणि वहिनी
## उतारवयातले सहचारी

अण्णा आणि वहिनी सत्तरीत पडले एकटे।
तब्येतीने ठीकठाक परी इच्छा नव्हती व्हावे दुकटे।।१।।

अण्णा तर सर्वस्वी एकटे मुले होती फार दूर।
दोन वर्षांनी होई भेट असाच जीवनाचा सूर।।२।।

हळूहळू मुलांचाही ओढा भेटीसाठी झाला कमी।
तुम्हीच या आमच्याकडे काळजीची देतो हमी।।३।।

अण्णांनी ठरविले जे व्हायचे ते इथेच होणार।
जीवनाच्या यावेळी मी कुठेच नाही जाणार।।४।।

वहिनींना दोन मुली पण टिकला नाही संबंध।
मुली होत्या गावात पण नव्हते ऋणानुबंध।।५।।

जरूर पडता आईची आठवण असेच जीवन।
आपले इथे कुणी नाही याचे होई सतत स्मरण।।६।।

दोघांची झाली एका समारंभात अचानक भेट।
गणेश आरती म्हणता दोघांचे जुळले सूर थेट।।७।।

वाढता गाठीभेटी कळल्या आवडीनिवडी।
नाटक संगीत साहित्य मिळत्याजुळत्या निवडी।।८।।

खाण्यातही दोघे दिसले शुद्ध शाकाहारी।
हळूहळू वाढले जाणे-येणे एकमेकांचे घरी।।९।।

दोघांचाही जाई छान वेळ हाच आशेचा किरण।
दोघांनाही नकोच होते संबंधांचे आवरण।।१०।।

एकमेकांचे सोबती यातच होता त्यांना आनंद।
दोघांनाही नकोच होते भावनांचे अनुबंध।।११।।

असाच सुरू होता जीवनाचा खेळ।
रोज गाठभेट यातच जाई त्यांचा वेळ।।१२।।

दोघेही आता सरकले ऐंशीच्या दशकात।
अण्णा म्हणे वहिनी तुम्ही या माझे घरात।।१३।।

एकमेकांची घेता काळजी यातच जीवन सरले।
एकमेकांची घ्यावी काळजी हे कर्तव्य झाले।।१४।।

एकमेकाला हवी साथ खूप कळली महती।
एकटेपणात जगणे व्यर्थ आहे ही आली प्रचिती।।१५।।

दोघेही भाग्यवान मानती देवाचे उपकार।
ऋणानुबंध होते म्हणून झाला हा प्रकार।।१६।।

देवा मला आधी उचल हीच मनी प्रार्थना।
माझ्यानंतर दुसऱ्याला नको त्रास हीच देवाला अर्चना।।१७।।

कोणाच्या जीवनात काय लिहिले नाही कल्पना।
आला तो दिवस सुखात घालवा ही मोलाची सूचना।।१८।।

❍❖❍

Scanned with CamScanner

# ५३. माझी मैत्रीण

एकच माझी जिवलग मैत्रीण आहे नाव तिचे कविता।
ध्यानीमनी ती सदैव असते तीच स्फूर्तिदाता।।१।।

माझे हाती लेखणी दिसता प्रसन्न ती होते।
सुंदर साध्या मस्त कल्पना तीच मला देते।।२।।

नवी कविता पूर्ण होता आधी तिला कळते।
पाठ माझी थोपटून ती प्रोत्साहित करते।।३।।

नवीन कविता पूर्ण व्हावी यातच यश असते।
लिहिता हात सुरू ठेव सदैव ती म्हणते।।४।।

स्वभाव माझा अति चंचल कधी न विसरावे।
हर प्रयत्ने वाचन-लेखन यात तू रमावे।।५।।

नव्या कल्पना, नवे विचार मीच तुला देते।
न थांबता सुरू ठेव तू हेच स्पष्ट करते।।६।।

प्रयत्नामध्ये थांबू नको यातच यश दिसते।
थांबला तो पूर्ण थांबतो सिद्धमंत्र वदते।।७।।

नवे विषय नव्या कल्पना झेप मोठी घ्यावी।
हाती घेतले पूर्ण करावे गोष्ट ही स्मरावी।।८।।

आराम विश्राम कंटाळा सर्व हे विसरावे।
पाठी तुझ्या मी दक्ष उभी रे सदैव स्मरावे।।९।।

Scanned with CamScanner

# ५८. कागद-पेन्सिल आणि कवी

समोर कागद हाती पेन्सिल बसला होता कवी।
दोघेही कंटाळता म्हणाले कर एक कविता नवी।।१।।

अरे आम्ही दोघे तर खऱ्या अर्थी तुझे मित्र।
आम्ही सर्वांआधी जाणतो तू रंगवलेले शब्दचित्र।।२।।

मी कोरा पेन्सील हाती चुकल्यासारखे वाटते।
सुरू कर लिखाण हेच आमचे मन म्हणते।।३।।

काय तुझे मनी हे सर्वांआधी आम्ही जाणतो।
कोणत्या मुहूर्ताची बघतो वाट हेच आम्ही विचारतो।।४।।

मदतीसाठी तुझ्या सरस्वती आहे आतूर ठेव तू जाणीव।
आजूबाजू बघ नव्या कल्पना, नवे विषय नाही उणीव।।५।।

आम्हाला खूप होई आनंद तू लिहिता नवी कविता।
वाचकांचा आनंद आम्हीही अनुभवतो येता-जाता।।६।।

वाचकांची प्रतिक्रिया तुला सांगणे हे नाही शक्य।
आम्ही जाणतो किती होती कष्ट लिहिता एक वाक्य।।७।।

जोवर तुझी तपश्चर्या तोवर सार्थकी आमचे जीवन।
समोरचा कागद नको ठेवू कोरा करावे याचे मनन।।८।।

वाहती नदी लिहिता कवी हे सर्वांना आवडती।
जोवर वाहती-लिहिती तोवरच त्यावर सर्वांची प्रीती।।९।।

❍❖❍

# ५. धर्मवीर संभाजी महाराज जयंती

## ज्येष्ठ शुक्ल द्वादशी शके १९४४

छत्रपती संभाजी राजा सदैव तुज स्मरतो।
धर्मवीर या शौर्यमूर्तीला लवून नमन करतो।।१।।
सिंहाचा तू छावा ठरता त्वेषाने लढला।
शौर्य-धैर्य तेज बघुनी काळही घाबरला।।२।।
सव्वाशे युद्धे लढता नेतृत्व तुझे दिसले।
अश्वारूढ समशेर बहाद्दर रूप मनी भरले।।३।।
धूर्त-धोरणी महामुत्सद्दी शत्रू तुझे दिसले।
शक्ति-युक्ति-बुद्धीने तू त्यांना हारविले।।४।।
त्याग-धैर्य-शौर्य तुझे अद्वितीय ठरले।
असा राजा पुन्हा न होणे हेच सत्य पटले।।५।।
बत्तीस वर्षांचे जीवन हे शौर्ययज्ञ ठरते।
संभाजी राजे अमर रहे सदैव मन म्हणते।।६।।
पूर्णपणे आजही तू आम्हांसी न कळला।
राष्ट्ररक्षणे सतत झुंजता युगपुरुष ठरला।।७।।
औरंगाबाद उशीर नको सहज व्हावी शुद्धी।
संभाजीनगर त्यासी म्हणावे दिसावी सुबुद्धी।।८।।
हिंदुराष्ट्र हा भारत होईल पुढे स्पष्ट दिसते।
तेच तुझे खरे स्मारक मनासी हे पटते।।९।।
शौर्य-धैर्य-त्यागाची मूर्ती शंभू ठरतो।
प्रचंड मोठे स्मारक व्हावे मनातले वदतो।।१०।।

# ४८. औरंगजेबाचे मनोगत

मी अतिरेकी धर्मवेडा आलमगीर झालो।
हिंदुसाठी सदासर्वदा काळदंड ठरलो।।१।।

महाराष्ट्राशी विशेष नाते खूप इथे रमलो।
शिवाजी-शंभू-राणी तारा सर्वांशी लढलो।।२।।

आग्र्याहूनी शिवाजी राजा जीवानिशी सुटला।
हाच माझा पूर्ण पराभव मीच कबूल केला।।३।।

शंभू राजा हाती येता हिशोब पूर्ण केला।
त्या छाव्याला हलाल करूनी मीची संपविला।।४।।

काशी-मथुरा श्रद्धास्थाने मीच नष्ट केली।
हिंदुमनावरी जखम कोरूनी मशीद बांधवली।।५।।

अत्र तत्र सर्वत्र माझ्या उरल्या आठवणी।
अनेक शहरी आजही दिसती मोगली घराणी।।६।।

औरंगाबाद माझ्या नावे विश्वास बसत नाही।
अनेक रस्ते माझ्या नावे कळत नाही काही।।७।।

हिंदु संस्कृती रीति-निती फार उच्च ठरले।
अत्याचारी सर्व पचवले हेच स्पष्ट कळते।।८।।

हिंदुंनो, हे विसरा सारे विनंती ऐकावी।
''जशास तसे'' सिद्धमंत्र हा अशी नीती व्हावी।।९।।

हिंदुराष्ट्र हिंदुधर्म अविनाशी ठरतो।
या मातीचा राग करी जो तोच नष्ट होतो।।१०।।

अखंड भारत नक्की होईल नाही मला संशय।
शंभूराजा सन्मानित व्हावा हाच खरा आशय।।११।।